राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ. जी. पी.परदेशी
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/जन्म व मृत्यु नोंदी मधील बदल/7455-8075/२०१०,दिनांक :3 जून,२०१०

**परिपत्रक**

**महत्वाचे**

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु,
जिल्हा परिषद ..............(सर्व)

२) गटविकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक
पंचायत समिती......................(सर्व)

३) आरोग्य अधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, महानगरपालिका,.....(सर्व)

४) मुख्याधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, नगरपरिषद/नगरपालिका.........(सर्व)

५) व्यवस्थापक, कॅन्टोंमेंट बोर्ड, ....................(सर्व)

विषय :- जन्म व मृत्यु नोंदी मधील बदला बाबत...

जन्म व मृत्यु नोंद झाल्यावर त्यामध्ये अनेक चुका झालेल्या असतात. सदर चूक दुरुस्तीसाठी संबंधित व्यक्तिस चूक दुरुस्ती बाबतचे आदेश घेण्यासाठी परस्पर उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, पुणे कार्यालयात पाठविण्यात येते. सदर बाब अत्यंत चुकीची असून निबंधकस्तरावर चूक दुरुस्ती होणे आवश्यक असते. कायदयाच्या अधिन राहून सदर चूक दुरुस्ती बाबत निर्णय घेण्यास आपण सक्षम आहात या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेली महत्वाची परिपत्रके यांच्या अनुषंगाने आपण सदर प्रकरणाचा निपटारा करु शकता. फक्त गुंता गुंतीची प्रकरणे आपल्या कार्यालयाच्या उपरीपत्राने या कार्यालयास पाठवावीत उपरी पत्रात सदर प्रकरणाबाबत संपूर्ण माहिती नमूद करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या कार्यालयास प्राप्त झालेले पुराव्याच्या छायांकित प्रती सुध्दा सदर उपरीपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. जेणेकरुन मार्गदर्शन करणे सोईचे होईल.

कोणत्याही व्यक्तिस त्याचे प्रकरण घेऊन परस्पर या कार्यालयास पाठवू नये. सदर परिपत्रकाची प्रत सर्व ग्रामसेवकास पाठविण्यात यावी. सदर परिपत्रकाबाबत केलेली कार्यवाही या कार्यालयास उलट टपाली कळवावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीसाठी सादर : मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

F:\83\Circular.doc